आज़ादी का
अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor: 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 8, Vol.I, Issue-LXVIII, 1 October 2022



# Thoughts and Works of Indian Social Reformers

## भारतीय समाजसुधारकांचे विचार व कार्य



Editor in Chief
**Dr. Ramkishan N. Dahiphale**

**Quarterly Research Journal**

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor:* 7 . 479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

*A Peer Reviewed Referred Journal*

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

Vol. I ISSUE - LXVIII Year – 8 01 Oct. 2022

Janata Shikshan Prasarak Mandal's

## MAHILA KALA MAHAVIDYALAY, AURANGABAD

**(Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University, Mumbai)**

**Organized One Day Interdisciplinary National Conference**

**on**

# Thoughts and Works of Indian Social Reformers

**:: Editor in Chief ::**

**Dr. Ramkishan N. Dahiphale**

Principal

Mahila Kala Mahavidyalay, Aurangabad

**Address for Correspondence**

**Website: www.wiidrj.com**

House No.624 – Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India – Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com / umbarkar.rajesh@yahoo.com

**Mob. No:** +91-9623979067

| | | | |
|---|---|---|---|
| 90. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | डॉ. पल्लवी सुरेश भावसार | 342 |
| 91. | "समाजसुधारकांच्या साहित्यातून येणारे सुधारणावादी विचार" | डॉ. रेवणनाथ काळे<br>डॉ. संदीप अ. बनसोडे | 346 |
| 92. | "कुशल प्रशासक व सामाजिक समता चळवळीचे उद्धारक: महात्मा बसवेश्वर" | डॉ. संतोष भिवसन काकडे | 350 |
| 93. | "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याचे ऐतिहासिक महत्त्व" | कु. युगंधरा य. शिवणकर | 355 |
| 94. | भारतीय समाजसुधारकांचे विचार व कार्य | ज्योती प्रकाश गावंडे | 360 |
| 95. | यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्राचा कृषी व औद्योगिक विकास | प्रा. डॉ. विजय चंद्रभान सुर्वे | 364 |
| 96. | अनाथाची आई सौं सिंधुताई सपकाळ: एक भारतीय समाज सुधारक | मिनाक्षी मारोती अंभोरे<br>प्रा. मधुकर हरी चाटसे | 368 |
| 97. | समाज सुधारकांच्या योगदानातून स्त्री प्रश्नांची सोडवणूक | ज्योती प्रविणचंद्र पाटील<br>जयश्री पुरुषोत्तम सरोदे | 371 |
| 98. | राजर्षी शाहू महाराज यांचे समाजसुधारणा चळवळीतील कार्य | राजेंद्र विठ्ठल पानसरे | 376 |
| 99. | भारतीय समाजाच्या जडणघडणीत समाज सुधारकांची भूमिका | देवकाते निलम हरिभाऊ | 380 |
| 100. | भारताच्या विकासात पुरुष व महिला समाजसुधारकांची भूमिका | Savita Bhagwan Bade | 383 |
| 101. | मराठी साहित्यातील ओवीगीतांतून समाजसुधारणा | श्रीमती ज्योती भगवानराव जोशी | 389 |
| 102. | लोकनेते मारूतराव घुले पाटील यांचे सहकार क्षेत्रातील योगदान | सोपान बाळासाहेब नवथर | 392 |
| 103. | संतांच्या साहित्यातून येणारे सुधारणावादी विचार. | कु. जाई संजय ठाणेकर | 397 |
| 104. | महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी विधवा स्त्रियांच्या विकासासाठी केलेले कार्य | कु.गायत्री जवाहरलाल तेली<br>डॉ. मनिषा जगदीशलाल वर्मा | 402 |
| 105. | युगस्त्री सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार | मरियंका मुत्तया डोंगरे | 405 |

# समाज सुधारकांच्या योगदानातून स्त्री प्रश्नांची सोडवणूक

संशोधक
ज्योती प्रविणचंद्र पाटील
मार्गदर्शक
जयश्री पुरुषोत्तम सरोदे
कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव email jyotiprakashchaudhari@gmail.com

प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकात सामाजिक सुधारणा सुधारण्याला खूप सारे महत्त्वपूर्ण बदल पहावयास मिळाले. नवीन शिक्षित समाज सुधारकांनी नवीन गोष्टी जुने कर्मकांड चालीरीती रुढी यांच्याविरुद्ध बंड उभारला. भारताच्या जडण घडणी मध्ये सामाजिक सुधारणा चळवळीला व संस्थात्मक चळवळीना वेगवेगळे समाज सुधारक यांचे योगदान लाभले. जातीभेद, लिंगभेद, धर्मांचा प्रभाव व उच्च वर्णी यांच्या हाती सत्ता या गोष्टी भारतीय समाज व्यवस्थेत अग्रेसर होत्या. स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय स्वरूपाची होती.शतकातील ब्रिटिशांच्या उदारमतवादी विचारांचा प्रभाव भारतीय समाज व्यवस्थेवर नव बुद्धिवादी लोकांच्या विचारांवर पडला.आणि तेच कारण समाज प्रबोधनाला व स्त्रीप्रबोधनाला महत्त्वाचे ठरले.ब्रिटिश शासनाच्या मदतीने स्त्री सुधारणाना चालना देण्यासाठी सुधारकांनी कायद्याची निर्मिती घडवून आणली .

सामजिक सुधारणा म्हणजे अस्तित्वात असलेल्या सामाजिक व्यवस्थेत नवीन मूल्य आणि विचारांची भर टाकणे व तसेच जुन्या परंपरा रुढी असंगत दृष्टिकोन समाजाचा बदलणे हे विचार समाज सुधारकांचे होते. समाजात प्रबोधनाची सुरुवात ही त्या समाजात वावरणाऱ्या संवेदनशील व बुद्धजीवी समूहाच्या कृतीतून अभिव्यक्तीतून व्यक्त होत असते. जगाच्या पाठीवर जर आपण पाहिले तर पंधराव्या शतकात स्त्री प्रबोधन हे युरोप खंडात घडून आले व त्यानंतर अठराव्या व एकोणिसाव्या शतकात स्त्री प्रबोधनाला भारतात सुरुवात झाली. पाचीमात्य व उदारमतवादी तत्त्वांचा प्रभाव भारतीयावर पडला. आज आपण एकविसाव्या शतकात महिला सक्षमीकरणाबद्दल बोलतो एकविसावे वर्ष तर महिला सक्षमीकारणासाठी करण्यासाठी महत्त्वाचे ठरले. पण महिला सक्षमीकरणासाठी ज्या समाजसुधारकांनी एकोणीसाव्या शतकात प्रयत्न केले गेले त्यामुळेच महिला सक्षमीकरणाचा पाया तेथूनच रोवला गेला. त्यामुळेच आपण एकविसाव्या शतकात महिला सक्षमीकरणाचा हा नवा आयाम आपण पाहतो आहे. सांगायचे झाले तर भारतीय महिला सुधारणेचा उत्क्रांती वादी इतिहास हा महिला सक्षमीकरणाचा सुद्धा इतिहास राहिला आहे. आज एकविसाव्या शतकात महिला सक्षमीकरण वारे वाहत असताना घडून गेलेल्या इतिहासाला विसरता येणे शक्य नाही. कारण प्रबोधन काळातच समाजसुधारका यांनी आपले जीवन सामाजिक राजकीय धार्मिक सुधारना करण्यात व्यतीत केले. तसे पाहता समाज सुधारणेचा संबंध प्रत्यक्ष महिला सशक्ती करणे या प्रक्रियेशी जोडला गेलेला आहे. सामाजिक प्रबोधनकारांनी त्या काळातच स्त्री विषयक प्रश्न सोडवणूक जर केली नसती तर महिला सक्षमीकरण प्रत्यक्षात ही व्याख्याच अस्तित्वात आली नसती. कोणतीही सामाजिक सुधारणा ही इतिहासाच्या प्रश्नाच्या मुळाशी जाताना पाहिले असता जेव्हा भारतात इंग्रजांचे शिक्षण सुरु झाले व युरोपात स्त्री सतराव्या शतकात महिला प्रबोधनाचे कार्य सुरु झाले आणि आधुनिक शिक्षण यांच्या विचारसरणीमुळेच भारतामध्ये एक सक्षम समाजसुधारकांची पिढी निर्माण झाली. भारताच्या समाजसुधारकांच्या या पिढीमुळेच व समाज सुधारण्याचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे स्त्री उद्धाराचे कार्य यांनी हाती घेतले.

राजा राम मोहन रॉय:

राजाराम मोहन राय हे स्त्री उध्दाराचे कार्य हिंदू धर्मातील पहिली सुधारणा करणारे व थोर समाज सुधारक होते .त्यातही स्त्रियांच्या उद्देश लक्षात घेऊन स्त्रीयांच्या उद्धारासाठी महत्त्वपूर्ण कार्य राजाराम मोहन राय यांनी केलेले आहे. राजा राम मोहन राय यांनी ब्रोम्हो समाजा ची स्थापना केली व या सामाजिक संस्थेच्या

माध्यमातून स्त्रियांचे उद्धाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले. बंगालमध्ये समाज सुधारण्याच्या माध्यमातून राजा मोहन राय यांनी खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणाला व स्त्री सक्षमीकरणाला वाचा फोडली. बालविवाह सती प्रथा यासारख्या जाचक बंधनातून भारतीय स्त्रीला मुक्त करण्याकरता आंदोलन उभारणारे आणि भारतीय प्रबोधनाचे जनक म्हणून राजा मोहन राय यांचे नाव अग्रसेर आहे. भारता मध्ये ज्ञान प्रसार स्त्रीयाच्या प्रगतीसाठी आणि उदारमतवादी आधुनिक सुधारणांचा प्रयत्नांना व राजा राममोहन राय यांनी अग्रीची भूमिका बजावली. बालविवाह सती प्रथेच्या पाशातून भारतीय स्त्रीला मुक्त करण्याकरिता आंदोलन उभारणारे व भारतात उदारमतवादी आधुनिक सुधारणांचे पाया रचनात मोलाची भूमिका बजावणारे राजा राम मोहन राय यांच्या कार्याला आजही सलाम करण्यात येतो.

त्यांनी प्राचीन सती पद्धतीला विरोध केला .सती प्रथेचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला होता.कारण त्यांच्या वहिनीला सती जावे लागले होते. धर्मग्रंथांमध्ये सती जाणे हे धर्म कर्तव्य असल्याचा उल्लेख नाही, हे त्यानी सर्वप्रथम सिद्ध केले.1829 मध्ये हि सती प्रथा कायद्याने बंद केली.राजा राम मोहन राय यांना नवविचारांचा जनक असे म्हटले जाते. बालविवाह, बालहत्या, केशवपन, जातिभेद, यासारख्या प्रथाचा त्यांनी कडकडून विरोध केला त्यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले आणि समाजात विधवांना न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केले.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर :

बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिले समाज प्रबोधनकार ठरतात. त्यांनी आपल्या सेवेतून "कुटुंब पोषणाची जबाबदारी दुय्यम मानून समाज सेवेला प्राधान्य दिले. त्यांनी बालविवाह, पुनर्विवाह सतीप्रथा यावर जांभेकरांनी सर्वप्रथम लिखाण केले व या प्रथांना विरोध केला. स्त्री शिक्षणाचे ते पहिले पुरस्कर्ते ठरतात. त्यांनी जगाचा देशाच्या इतिहासाचा प्रथम अभ्यास केला व इतिहास समोर ठेवून प्रत्येकाने ते जगले पाहिजे असा त्यांच्या संदेश होता. त्यांनी "हिंदू स्त्रियांच्या समस्येकडे समाजसुधारकांचे प्रथम लक्ष वेधले समाज प्रबोधनाचे कार्य फार मोठे केले. कृतीतून लेखनातून कार्यातून समस्त सर्वस्तरातीलच स्त्रियांना 'विद्याभिलासी व्हा, विद्याभ्यास करा, लोकांना शिक्षण द्या. लोकांमध्ये देशाभिमान व स्वधर्माभिमान निर्माणकरा असा त्यांनी समाजात उपदेश केला, त्यांनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला.

महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्री उद्धाराचे कार्य:

त्या काळातील समाजातील नेमके दुखणे हेच ज्योतिबांना कळले होते. म्हणूनच शोषित पराभूत समाजाच्या पर्यायी इतिहास लिहू पाहणारे फुले म्हणजेच आपल्या इतिहासातील एक महत्त्वाची क्रांतिकारी शक्तीच होती. स्त्रिया, कष्टकरी शेतकरी, यांचे शोषण दिसले. समाज सुधारणा जर करायची असेल तर स्त्री शिक्षणावर पर्याय नाही हे ज्योतिबांना मर्म उमगले. कल्याणकारी सुधारण्याच्या मार्गाने वेगवेगळे दडपलेला समाज आहे व तेथूनच केवळ डागडूजी करून प्रश्न सोडवायचे हे ज्योतिबांना पूर्णतः आमान्य होते. मनुष्य जातीला जन्म देणारी संगोपन संवर्धन करणारी स्त्री पुरुषापेक्षा निसंशय श्रेष्ठ आहे असा निर्वाळा फुले देतात. स्त्री सत्ता मिळवायची झाल्यास त्यांना शिक्षण दिले पाहिजे असा ज्योतिरावांचा आग्रह होता. मुके पणाने सोसणाऱ्या स्त्रियांच्या हाती घराचा, समाजाचा आणि राज्याचा कारभार द्यायचा झाला तर त्यांना आपल्याला काय हवे काय हे बोलण्याचे बोल व निर्भयता हवी हे निर्माण करण्याचा पहिला प्रयत्न ज्योतिरावांनी केला.हे त्यांचे फार मोठे श्रेय आहे यांना खरी सत्ता मिळवायची झाल्यास त्यांना शिक्षण दिले पाहिजे हा ज्योतीबांचा आग्रह महाराष्ट्रातील सुसंस्कृत आणि सुशिक्षित पेशव्यांच्या पुण्यात ज्योतिराव फुले यांनी आपल्या पत्नी समवेत स्त्री शिक्षणाचे पाऊल उचलले. आणि तेच पाहुल स्त्रियांसाठी महत्त्वपूर्ण ठरले. महिलांचा उद्धार व्हायचा असेल तर शिक्षण हे अत्यावश्यक आहे हे ज्योतिबांनी ओळखले म्हणूनच त्यांनी ऑगस्ट 1848 मध्ये खास मुलींकरता पुण्यात शाळा काढली .या शाळेत मुलींना शिकवण्यासाठी शिक्षिका मिळत नव्हत्या म्हणून त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना आधी शिक्षित केले व त्यांना शिक्षिका बनविले 1851 मध्ये बुधवार पेठेत मुलींची दुसरी शाळा काढली. समाजातील उच्च वर्गातील विधवा स्त्रियांचे जीवन अतिशय दुःखमय व अंधारमय होते. हे त्यांचे यांचे हाल थांबावेत म्हणून पुरुषांप्रमाणे त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून

महात्मा ज्योतिराव फुले यांनी खंबीरपणे विधवा पुनर्विवाह चा पुरस्कार केला त्यांनी 1864 मध्ये पुण्यातील गोखलेंच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

ज्योतीबांनी त्यावेळेस धर्माच्या व अंधश्रद्धेच्या नावाखाली तात्कालीन पुरुषसत्ता, प्रतिगामी समाजाकडून स्त्रियांसाठी पूर्व हिंसक वागणूक अशा प्रकारच्या स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचार विरोधात ब्रिटिश सरकारच्या मदतीने काही महत्त्वपूर्ण कायदे ज्योतिबांनी त्या काळात केले.

विद्यासागर ईश्वरचंद्र:

विद्यासागर ईश्वरचंद्रयांनी स्त्रियांना मोफत शिक्षण मिळणाचे नव नवे अभ्यासक्रम, ग्रंथे, पद्धती यासारख्या योजना अवलंब केला. सुशिक्षित स्त्री हे समाजाला मिळालेले वरदान आहे असे ते म्हणत. त्यानंतर विधवा पुनर्विवाह संदर्भात त्यांनी ब्रिटिश शासन दरबारी देखील परखड व स्पष्ट भूमिका घेतली. बहु पत्नीत्व या प्रथेलाही देशभरात त्यांनी विरोध केला.ईश्वरचंद्र विद्यासागर हे नैतिक मूल्यचे पुरस्कर्ते होते.विद्यासागर हेच स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. त्यावेळेस विधवांची स्थिती अतिशय दयनीय होती. विधवा पुनर्विवाहासाठी त्यांनी कार्य केले त्याचाच परिणाम म्हणून विधवा पुनर्विवाह कायदा त्यांनी 1856 मध्ये आणला. विधवा पुनर्विवाह प्रेरित झाल्याने त्यांनी आपला एकुलता एक मुलगा याचे लग्न विधवेशीकेले. विद्यासागर ईश्वरचंद्र यांनी बालविवाहाला सुद्धा विरोध केला.एक तर ईश्वरचंद्र हे राजा राम मोहन राय यांच्या कार्याने प्रभावित झालेले होते. त्या प्रमाणे राजा मोहन राय यांचा समाज सुधारणा करण्याचा वारसा पुढे नेण्याचे काम केले येथे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

महर्षी धोंडो केशव कर्वे:

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री उद्धारासाठी विशेष कार्य केलेले आहे.इसवी सन 1893 मध्ये त्यांनी विधवा पुनर्विवाह मंडळ वर्धा येथे स्थापन केले. या ठिकाणी विधवा स्त्रियांची नोंदणी करून विवाह कार्य या मंडळामार्फे केली जात होते. 14 जून 1896 रोजी पुण्यात जवळील हिंगणे या ठिकाणी अनाथ बालिकाश्रम स्थापन केला. विधवा विवाहाचे ते कृतिशील पुरस्कर्ते होते. मानवी समतेचे आग्रही राष्ट्र उभारणीत स्त्री शक्तीचा सहभागाची आवश्यकता अधोरेखित करणारे तसेच बहुजन व अपक्षित घटकाला स्वतंत्र व स्वावलंबी बनवण्यासाठी स्त्री शिक्षणाचे आग्रही व ठाम निश्चित भूमिका मांडणारी हि विचारधारा पुढे नेऊन एक कट्टर समर्थक व कृतिशील अनुयायी म्हणून त्यांनी कार्य केले. त्या काळात स्त्रियांची स्थिती दयनीय स्वरूपाची होती. त्यावेळच्या स्त्री शक्तीला सामर्थ्य घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कर्वे यांनी केले. विविधपूर्ण स्त्री शिक्षण संस्था,विधवा विहोत्सक मंडळ, महिला विद्यापीठ ,अनाथ बालिकाश्रम, समता संघ, निष्काम कर्मठ इत्यादी संस्थात्मक कार्याद्वारा स्त्रियांना सक्षम व सबल बनवण्यासाठी महर्षी कर्वे यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत प्रयत्न केले.

पंडिता रमाबाई रानडे:

पंडिता रमाबाई रानडे यांनी स्त्री उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य घालवले. त्यावेळेस भारतीयांची स्थिती पाहता त्यात भारतातील स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती हे पंडिता रमाबाई यांनी जवळून पाहिले त्या अवस्थेची त्यांनी जाहीरपणे टीका केली. आणि स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळायला हवा त्याचप्रमाणे बालविवाह बंद पडले पाहिजे व विधवा पुनर्विवाह घडून आणायला हवेत. स्त्रियांच्या उद्धारासाठी रमाबाई यांनी 1882 मध्ये पुणे येथे आर्य महिला समितीची स्थापना केली. पंडित रमाबाई यांनी मुंबई येथे 11 मार्च 1889 रोजी शारदा सदन नावाची संस्था स्थापन केली या संस्थेत निरक्षित विधवा व अनाथ स्त्रिया यांचेच राहण्याची मोफत व्यवस्था करण्यात आली. त्याचप्रमाणे शारदा सदनामध्ये स्त्रियांना शिक्षण देण्याची व्यवस्था ही करण्यात आली. पंडिता रमाबाई यांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला व त्यानंतर ख्रिश्चन मुलींसाठी त्यांनी मुक्ती मिशन नावाची संस्था स्थापन केली. स्त्रियांचा उद्धार करणे हेच रमाबाईचे ध्येय होते. फुले यांचा वसा यशस्वी पुढे नेला . त्यापासूनच शिक्षणाला सुरुवात करून व स्त्री शिक्षणासाठी सेवासदन व हिंदू सोशल लिटरली क्लब यासारख्या सामाजिक व शैक्षणिक संस्था स्थापन करण्यापर्यंतचा प्रवास हा नक्की स्त्री सक्षमीकरणाचा एक पाया होता.

रघुनाथ धोंडो कर्वे

रघुनाथ धोंडो कर्वे हे महर्षी कर्वे यांचे चिरंजीव होते. वडिलांप्रमाणेच स्त्री विषयांवर त्यांनी समाज प्रबोधन केले. रघुनाथ धोंडो कर्वे यांनी स्त्रियांच्या एका वेगळ्याच प्रश्नावर खंबीरपणे आपली भूमिका मांडली . महिला

सबलीकरणाचे वर्ष आपण साजरे करत असताना की जो आज स्त्री चळवळीचा तो प्रमुख मुद्दा आहे तो त्यांनी त्याकाळी स्पष्ट केला. ध हि कर्वे यांच्या मते संतती नियमाचे व्यापक उद्दिष्ट हे सामाजिक स्वास्थ्याचे असून ते निकोप स्त्री पुरुष संबंधावर आधारित असते. आधुनिक दृष्टीने व बुद्धीप्रामण्याच्या कसोटीवर योग्य ठरणाऱ्या लोकशिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केला. कर्वे यांनी संतती चे नियमन आचार विचार ही पुस्तके लिहिली. त्याचप्रमाणे वेश्याव्यवसाय आधुनिक आहारशास्त्र आधुनिक कामशास्त्र ही पुस्तके लिहिली. कर्वे यांनी संतती प्रतिबंध व लैंगिक रोग प्रतिबंध समस्यांवर क्रांतिकारी कार्य केले यातून स्त्रियांनी शारीरिक दृष्ट्या सक्षम व सुदृढ असणं त्याचबरोबर स्त्रियांनी सक्षम व सदृढ व नीरोगी पिढी निर्माण करणे याबद्दल अधिकार स्वतःकडे राखून ठेवणे हे अपेक्षित होते. स्त्री ही केवळ पुनर्निर्मितीची साधन नसून ती एक जिवंत व स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. हे समाजाने मान्य केले तरच तिला सक्षम होता येईल आणि सक्षमीकरणाचा मुद्दा खऱ्या अर्थाने मांडता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनामध्ये स्त्रियांच्या प्रगतीला, विकासाला अत्यंत महत्त्वाचं स्थान होतं. 'एखाद्या समाजाची प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील महिलांची प्रगती किती झाली आहे हे मी मोजतो. – या वाक्यावरुनच स्त्रिया बद्दलची जाणीव बाबा साहेबांची व्यक्त होते.आंबेडकरांनी समाजात स्त्रीची कितपत प्रगती झाली आहे त्यावरून मी त्या संपूर्ण समाजाचा प्रगतीचा आलेख ठरवतो हे बाबासाहेबांचे वाक्य त्यांच्या मनात स्त्रीया बाबत असलेला आदर स्पष्ट करण्यात पुरेसे आहे .स्त्रियांना कायदेशीर हक्क देण्याविषयी आणि विशेषतः वडिलोपार्जित संपत्तीत वाटा देण्याविषयी बाबासाहेब आधीपासूनच आग्रही होते. यासाठीच बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल बनवले होते मात्र ते पास होऊ दिले गेले नाही.लग्न,वारस, दत्तक, इत्यादी संबंधित सर्व कायदे या हिंदू कोड दिला मध्ये होते. १९२७ साली मुंबई विधान परिषदेवर निवडून आल्यानंतर १९२८ साली भारतातील महिला कामगारांसाठी मॅटर्निटी बेनिफिट बिल पहिल्यांदा सभेसमोर चर्चेसाठी आणणारे आणि स्त्रियांना बाळंतपणासाठी हक्काची वैद्यकीय रजा मिळाली पाहिजे म्हणून आग्रही असणारे बाबासाहेब हे पहिले सदस्य. त्यांच्या प्रयत्नांमुळे मॅटर्निटी बेनिफिट अॅक्ट अस्तित्वात आला.1942 ते 1946 मध्ये लेबर मिनिस्टर म्हणून बाबासाहेब काम करीत होते equal pay for equal work in irrespective of sex ही क्रांतिकारी कल्पना राबवण्याचे श्रेय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकराना जाते. याचा प्रतिबिंब सुद्धा आपल्या विधानात राज्याने पाळावयाची मार्गदर्शक तत्वे मधील 39 (ड )मध्ये पडलेले दिसून येईल.

महर्षी राजर्षी शाहू महाराज:

शाहू महाराजांनी स्त्री मुक्तीचे पाच कायदे संमत करून घेतले होते. १. पुनर्विवाह नोंदणी कायदा. २. आंतर धर्मीय व आंतरजातीय विवाहकायदा. ३. स्त्री अत्याचारांना प्रतिबंध करणारा कायदा.. ४. काडीमोड किंवा घटस्फोट कायदा ५. जोगतिणी प्रतिबंध कायदा."

शाहू महाराजांचा पाचवा कायदा जोगतिणी, मुरळी, देवदासीइ. कनिष्ठदर्जाचे उपेक्षित जीवन जगणाऱ्याया स्त्रियांच्या संदर्भातील कायदा १७ जानेवारी १९२० रोजी संमत केला गेला. देवाच्या नावाने लहानपणीच सोडलेल्या या स्त्रियांना पुढे अत्यंत अनैतिक वदयनीय आयुष्य काढावे लागत असे. महाराजांनी हा कायदा करून या स्त्रियांना देवाला सोडल्यामुळे जे विशिष्ट हक्क प्राप्त होतात तेच कायद्याने रद्द केले.

निष्कर्ष:

राम मोहन राय यांच्या नेतृत्वाखाली झालेली ही स्त्री समाजाची तळमळ व चळवळी सोबत त्या काळातील देवेंद्रनाथ टागोर, रवींद्रनाथ टागोर, इत्यादी प्रबोधिनी वेगवेगळया पातळयांवर स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू करून कायदा, साहित्य, कला विविध क्षेत्रांमध्ये त्याचा प्रभाव दिसू लागला.सामाजिक सुधारणा चळवळतील सुधारकांचे एकूण विचार व कार्य पाहता त्या काळातील त्यांची स्त्री प्रश्नांची भूमिका आजही आपल्याला महत्त्वपूर्ण दिसते. त्यांनी धर्म जातीनुसार नव्हे तर संपूर्ण समाजात स्त्रीचे कसे शोषण होते याचे विश्लेषण केले आणि त्याकाळच्या सुधारकांच्या स्त्री विकास सुधारण्याच्या प्रयत्नामुळे आजची स्त्री ही सक्षम व प्रत्येक क्षेत्रामध्ये पुढे जाऊ शकली आहे. सर्वतोपरी प्रयत्नांमुळे स्त्री विकासाला कलाटणी देण्याचं कार्य हे या थोर समाज सुधारकांनी केलेले आहे. आजच्या काळातही स्त्री विषयक दृष्टिकोन बदलण्यासाठी या सुधारकांच्या असामान्य कार्य

आत्मसात करण्याची नितांत आवश्यकता आहे. स्त्रीयाची स्त्र स्तिती बदलेलेली गेली असली तरी आजही स्त्री विषयक दृष्टिकोन मोठ्या प्रमाणात बदल होण्याची गरज भासत आहे. आजच्या स्त्रियांच्या समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारकांची भूमिका हि स्त्री संघटनाना व स्त्रियांचा अभ्यास करणाऱ्यांना दिशादर्शन करणारे ठरतात. दीडशे वर्षांच्या कालानंतर ही सामाजिक सुधारणा चळवळतील सुधारकांच्या स्त्री सुधारणा विचारांची आवश्यकता आजच्या काळातल्या स्त्री प्रश्नाविषयी महत्त्वाची ठरते तसेच त्यांनी केलेले कार्य हे अनन्यसाधारण आहे व आजच्या स्त्रियांच्या विकासात याच समाजसुधारकांचा मोलाचा वाटा आहे.

संदर्भ


1. 'स्त्री प्रश्नाची'वाटचाल परीवर्तनाच्या दिशेने, विद्युत भागवत प्रतिभा प्रकाशन
2. मराठी स्त्रीयाची स्थिती आणि स्त्री शिक्षणाचे प्रयोग सुचित्रा नाईक मराठी संशोधन मंडळ ग्रंथ संग्रहालय, दादर
3. डॉ. भीमराव आंबेडकर तसेच ध. संजय बंजारे यांचा फेसबुकवरील हिंदीमधील लेख.
4. महिला सक्षमीकरणातील टप्पे प्रा. कल्पना राजेश कलके
5. भारतीय स्त्रीला कायदेशीररित्या सक्षम करणारे "बाबा" Adv Anjali Zarkar
6. इतिहास गर्भित शोधनिबंध प्रा अरुणा रवींद्र बाभोले .

SIDDHI PUBLICATION

# सिद्धी प्र...शन

बेलानगर, भावसार चौक, नांदेड-4316... ...ाराष्ट्र - भारत.


येथे सर्व प्रकारची पुस्तके, नियतकालिके व मासिके प्रक... केली जातील.


पुस्तकांसाठी ISBN (National) नंबर उपलब्ध आहेत, तसेच एम.फिल. व पीएच.डी संशो... ...के छापून मिळतील.

संपर्क : डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर, सौ.पल्लवी लक्ष्मण शेटे मो. ...23979067

- Our Published Books -






- Our Services -

- ISBN Book
- Call for paper
- International Research Journal
- Ph.D. & M.Phil Thesis Book
- E-Book
- Conference and Seminar Proceeding
- Educational Videos and Notes
- Educational Activities

G Pay PhonePe BHIM 9623979067

Siddhi Prakashan

Worldwide International Inter Disciplinary Research Journal

Website : www.wiidrj.com

Mrs.Pallavi L Shete, H.No. 624, Bela Nagar, Near Maroti Mandir (Sanskriti Public School), Taroda Kh. Nanded - 431 605 Maharashtra (India)

Email : umbarkacrajesh@yahoo.com
shrishprakashan2009@gmail.com

Mob : +91-9623979067

ISSN 2454-7905